Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

ISSUE No- (CCCXVI ) 317

September -2021

National E-Conference on

## Socio-Religious and Political Movements in the Pre-independence Period and Today



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive-Editor
Dr. Nilima D. Deshmukh
Principal
Sahakar Maharshi Late Bhaskarrao
Shingne Arts College,
Khamgaon, Dist. Buldana

Executive-Editor
Dr. J. B. Devhade
Principal
Late Pushpadevi Patil Art's and Science
College, Risod, Dist.Washim

Editors
Dr.Shrihari pitale
Assist.prof.& HOD Department of History
Late Pushpadevi Patil Art's and Science
College Risod Dist.Washim

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

ISSUE No- (CCCXVII ) 317

**September -2021**

National E-Conference on

## Socio-Religious and Political Movements in the Pre-independence Period and Today



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive-Editor**
**Dr. Nilima D. Deshmukh**
Principal
Sahakar Maharshi Late Bhaskarrao
Shingne Arts College,
Khamgaon, Dist. Buldana

**Executive-Editor**
**Dr. J. B. Devhade**
Principal
Late Pushpadevi Patil Art's and Science
College, Risod, Dist.Washim

**Editors**
Dr.Shrihari pitale
Assist.prof.& HOD Department of History
Late Pushpadevi Patil Art's and Science
College Risod Dist.Washim

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)

Scanned with CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, (CCCXVII) 317
ISSN : 2278-9308
September, 2021

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Women Pioneers Of India: Their Contribution Towardswomen Education In Social Reform Movement,19th & 20th centuries Ce — **Dr. Indira P** | 1 |
| 2 | बुलडाणा जिल्ह्यातील सत्यशोधक जलसाकार शावजी रावजी पाटील : एक आढावा — **डॉ. संतोष बनसोड** | 5 |
| 3 | सत्यशोधक संपतराव भिवाजी शिंगणे — **डॉ.किशोर मारोती वानखडे** | 8 |
| 4 | महाराष्ट्रातील आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी कामगारांचे योगदान — **प्रा.सुनिल मदन मनवर** | 18 |
| 5 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक कार्य — **प्रा. डॉ. एस.एन. तुरुकमाने** | 23 |
| 6 | कर्मवीर अण्णांच्या वैचारिक वारसदार : प्राचार्या सुमतीबाई पाटील — **डॉ.जाधव संतोष हनुमंत** | 25 |
| 7 | स्वातंत्र्य संग्रामातील मातृभूमि वृत्तपत्राचे योगदान(सन १९३१ ते १९४७) — **प्रा.डॉ.संतोष गोपाळकृष्ण कुळकर्णी** | 31 |
| 8 | मातृभूमिच्या संपादिक प्रमिलाताई ओक यांच्या नेतृत्वातील चले जाव आंदोलन — **प्रा.डॉ.भास्कर शा.वझिरे** | 34 |
| 9 | सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण विषयक कार्य: ऐतिहासिक चिंतन — **प्रा.डॉ. संदिप व्ही. भुरले** | 37 |
| 10 | स्वातंत्र्यपूर्व काळातील धार्मिक, सामाजिक व राजकिय चळवळी व सद्याची परिस्थिती — **प्रा. दिवाकर कांबळे** | 41 |
| 11 | भारतीय स्वर्तंत्र्य लढयात स्त्रियाचे योगदान — **डॉ.राजाराम पिंपळपल्ले** | 49 |
| 12 | विधवांच्या उध्दारांसाठी ब्रिटीश काळातील चळवळी — **डॉ.विजय रामदास तिरपुडे** | 55 |
| 13 | महीला क्रांतीकारी कनकलता बरूआ यांचे भारतीय स्वातंत्र चळवळीतील योगदान — **विनोद उखर्डा धर्माळे** | 59 |
| 14 | स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक चळवळी आणि आज (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळी) — **प्रा. डॉ. आनंद के. भोयर** | 62 |
| 15 | प्रांतिक कौन्सिलच्या खामगाव जळगाव खेडेविभाग मतदारसंघाची १९३७ची निवडणूक – एक विश्लेषण — **डॉ श्याम प्रकाश देवकर** | 67 |
| 16 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे योगदान — **प्रा. रेखा बडोदेकर** | 71 |
| 17 | पुनर्विवाह चळवळीचा इतिहास — **प्रा.डॉ. भाऊराव रामेश्वर तनपुरे** | 76 |
| 18 | स्वातंत्र्यपूर्व लढयातील बाबूगेनू सैद याची कामगिरी — **स्मिता समिर अंध्याल** | 80 |
| 19 | स्त्री जातीचे उध्दारक : महर्षी कर्वे — **डॉ.आर.यु.हिरे** | 83 |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 20 | रामभाऊ रूईकरांचे राजनांदगाव येथील कामगार चळवळीतील योगदान डॉ.पुरूषोत्तम माहोरे | 86 |
| 21 | सामाजिक सुधारणेचे अग्रदूत रू राजा राममोहन रॉय व ब्राह्मो समाजाचे कार्य प्रा.डॉ.नंदकिशोर ल. अरूळकर | 92 |
| 22 | सामाजिक सुधारणा व गुलाबराव महाराज डॉ.भानुदास. डी. जामनेकर | 95 |
| 23 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन शिक्षण विषयक विचार प्रा. डॉ. प्रमोद ना. घ्यार | 99 |
| 24 | वैयक्तिक सत्याग्रह व छोडो भारत चळवळीत धरणगाव (जळगाव) तालुक्यातील जनसामान्यांचा सहभाग प्रा.डॉ.दिनेश रामदास महाजन | 104 |
| 25 | भारताच्या स्वातंत्र्य लढयातील स्वातंत्र्य वीरांगना शांती घोष व सुनिता चौधरी डॉ. एम.व्ही. जाधव | 107 |
| 26 | डॉ बाबासाहेब आंबेडकर आणी सामाजिक समता चळवळ प्रा.डॉ.सुरेश ल.पंडित | 110 |
| 27 | महात्मा ज्योतीबा फुले यांचे कार्य प्रा. डॉ. डी डी.जोंधळे | 112 |
| 28 | A Historical study of the influence of Mahatma Phule's thought **Pro. Dr. Pramod Rameshwar Chavan** | 116 |
| 29 | Contribution of Women in Socio-Religious and Political Movement in the Pre-independence Period & Today **Mr. NutanVishnudas Chouhan** | 118 |
| 30 | "Education can make Democracy more Powerfull : Ambedkar" **Prof. Dr. Ashok Bhorjar** | 124 |
| 32 | Social, Religious and political moment in world scenario **Dr. Yogarajsingh R Bais** | 126 |
| 33 | Awakening Women's Movement in Pre-Independence Period **Dr. S. M. Bhowate** | 130 |
| 34 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्वातंर्त्यपूर्व काळातील राष्ट्रीय कार्य (इ.स. १९३५ मधील सालबर्डी यज्ञ) प्रा.डॉ.विलास एम. डेहणकर | 134 |
| 35 | भारतीय होमरूल चळवळ डॉ. प्रदिप शा. ढोले | 137 |
| 36 | क्रांतीची जननी मॅडम भिकाजी कामा यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान डॉ. अफरोज हनिफ शेख | 140 |
| 37 | मानवाधिकार आणि स्त्रीयांचे सबलिकरण प्रा.डॉ. हरीदास लाडके | 145 |
| 38 | भारतीय स्वातंर्त्य लढ्यातील क्रांतिकारी स्त्रियांचे योगदान प्रा. डॉ. किशोर शेषराव चौरे | 148 |
| 39 | वासुदेव बळवंत फडके यांची सशस्त्र चळवळ डॉ श्रीहरी रंगनाथराव पितळे | 152 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार व कार्य डॉ. राजशेखर हिरेमठ | 154 |




Scanned with CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, (CCCXVII ) 317
ISSN : 2278-9308
September, 2021

# क्रांतीची जननी मॅडम भिकाजी कामा यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान

**डॉ. अफरोज हनिफ शेख**
प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, उमरेड रोड, नागपूर ३९, ताजविला शामबाग, जाफरी हॉस्पीटल बाजुला,उमरेड रोड, नागपूर

**प्रस्तावना :**

आधुनिक भारताच्या इतिहासात भारतीय स्वातंत्र्य संग्राम हा एक अभूतपूर्व अध्याय समजला जातो. कोणत्याही प्रकारचे शस्त्र हातात न घेता सत्य आणि अहिंसेच्या तत्वांचा अवलंब करुन सत्याग्रहाच्या मार्गाने जावून शक्तिशाली ब्रिटीश सत्तेला विरोध करुन भारताचे स्वातंत्र्य मिळविणे इतके सोपे नव्हते. परंतु भारतीयांनी स्वातंत्र्य मिळवून संपूर्ण जगासमोर एक वेगळेच उदाहरण प्रस्तुत केले.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाची एक प्रमुख विशेषता ही होती की, अनेक वर्षापासून 'केवळ घर हेच विश्व' 'चूल आणि मूल' इथपर्यंत मर्यादित आहोत ही सकल्पना मान णाऱ्या हजारो स्त्रियांनी संग्रामात सहभागी होऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात आपले मोलाचे योगदान दिले. त्यात प्रामुख्याने भारतातील स्त्रियांनीच नव्हे तर विदेशी स्त्रियांनी ही आपल्या जीवनाची पर्वा न करता आपले सर्वस्व अर्पण केले. आपण भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत अरुणा आसफअली, सरोजीनी नायडू, सुचेता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडीत, अक्तदेवी, जयावती सिंघवी, रजनी घोष इ. महिलांनी केलेली कामगिरी आपण विसरु शकत नाही. तसेच भारतात वास्तव्यास असलेल्या काही प्रसिद्ध विदेशी महिलांचे योगदान ही विशेष उल्लेखनीय आहे. त्यात प्रामुख्याने रोजा लक्जे बर्ग, डानामार्शमेन, लेडी डफरीने डॉ. ॲनी बेझंट, भगिनी निवेदिता, मॅडम भिकाजी कामा यांचा समावेश होतो.

भारतीय स्वातंत्र्यस्वातंत्र्यलढ्यातील महिलांचे योगदान ह्या शिर्षकांर्तगत होणाऱ्या राष्ट्रीय चर्चासत्रात मी क्रांतीची जननी मॅडम भिकाजी रुस्तम कामा यांचे योगदान हा लघुशोध निबंध सादर करीत आहे.

**जीवनवृतांत :**

क्रांतीची जननी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मादाम भिकाजी रुस्तम कामा चा जन्म मुंबई येथे सप्टेंबर २५ रोजी १८६१ एक गर्भश्रीमंत पारसी कुटुंबात झाला. वडील सोराबजी फ्रेमजी पटेल एक व्यापारी होते. लहाणपणापासूनच त्या कुटुंबातील सदस्यांपेक्षा वेगळ्या विचारांच्या व स्वतंत्र मतांच्या होत्या. भिकाजी कामाचा विवाह रुस्तम के.आर. कामा यांच्यासोबत झाला होता. पण मॅडम कामाचे वैवाहिक जीवन फार काळ टिकू शकले नाही. तरी ही हताश व दुखी न होता त्यांनी स्वतःला सावरुन देश सेवेच व्रत घेतले[१]. त्यांना हिंदी, इंग्रजी, रशियन, फ्रेंच, हिब्रु, पारशी अशा अनेक भाषांचे ज्ञान असल्यामुळे लोकांशी त्या त्यांच्या भाषेतच बोलत असत.

**क्रांतीकारी लेखिका मादाम कामा :**

मादाम कामाची लेखणी व वाणी दोन्ही भारताच्या स्वातंत्र्यासाठी चालल्या. इ.सन १९०१ मध्ये मादाम कामा युरोपला गेल्या तिथे प्रथम दादाभाई नौरोजी यांच्या सोबत काँग्रेसच्या कार्याचा प्रचार व प्रसार केला. तेथे शामजी कृष्ण वर्मा, स्वातंत्र्यवीर सावरकर, सरदार सिंह राणा यांच्यासोबत त्यांचा परिचय झाला. पंडीत शामजी कृष्ण वर्मा यांनी सुरु केलेल्या इंडियन सोशिओलॉजिस्ट या पत्रकाच्या त्या प्रमुख लेखिका बनल्या. त्यातून त्यांनी क्रातीकारी विचार



Scanned with CamScanner

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**

Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, (CCCXVII ) 317

ISSN : 2278-9308 September, 2021

मांडायला सुरुवात केली. मादाम कामांनी आर्यलँड, ग्रीक, मोरक्को व इतर देशातील स्वतंत्रता सेनानी सोबत सतत पत्रव्यवहार केला. त्यांना भारतातील स्थितीची कल्पना दिली. तसेच त्यांनी वीर सावरकरांच्या 'द हिस्ट्री ऑफ द वार ऑफ इंडियन इंडिपेण्डेन्स' या पुस्तकाचे फ्रेंच भाषेत भाषांतर केले.१९०९ मध्ये मादाम कामा यांनी जिनेव्हा वरुन 'वंदेमातरम' नावाचे मासिक पत्र काढले जे तेथील क्रांतीकारकांचे मुखपत्र बनले होते[२].

मादाम कामा आपल्या देशभक्तीच्या कार्यात किती जागृत व तत्पर होत्या हे पुढील गोष्टीवरुन लक्षात येते. त्या काळातील प्रसिद्ध क्रातीकारी रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की बरोबर त्यांनी संपर्क प्रस्थापित केला होता. मॅक्झिम गॉर्कीनी मादामकामा यांना भारतातील स्त्रियांची सद्यस्थिती व त्यांचा राष्ट्रीय स्वतंत्रता आदोलनातील सहभाग यावर लेख लिहिण्याची विनंती केली होती[३]. थोर क्रांतीकारी मदनलाल धिंग्रा यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांनी 'मदन तलवार' ह्या क्रांती पत्रिकेची जर्मनीची राजधानी बर्लिन मधून वितरण केले. १७ जून १९११ मध्ये दक्षिण भारतात टिनेवली जिल्ह्याच्या रेल्वे जंक्शन वर न्यायाधिश मिंग ऐशे यांची बांशी अययर याने गोळ्या झाडून हत्या केली. ह्या घटनेने प्रेरित होऊन मादाम कामांनी आपल्या एका लेखात लिहिले, भारतात जे होते आहे ती ईश्वराचीच ईच्छा आहे. कारण त्या काळात जनसमुहावर गीतेतील कर्म करीत रहावे या वचनाचा प्रभाव पडलेला होता. सोबतच त्यांनी लिहिले. भारतात एकीकडे दिल्ली दरबार भरत आहे; तर दुसरीकडे भारत गाफील नाही तर तो जागा झालेला आहे, असे जहाल लिखाण मॅडम कामा करीत असत. अशाप्रकारे मादाम कामा यांनी आपल्या लेखनीद्वारे क्रांती घडवून आणण्याचे महान कार्य केले[४].

**उत्तम वक्ता व देशभक्तीची प्रेरणा देणाऱ्या मादाम कामा :**

समाजसेवा व देशसेवेचे व्रत घेतलेल्या मॅडम कामा यांनी इ.सन १८९७ मध्ये जेव्हा मुंबईत प्लेगची साथ पसरली होती, त्यावेळी प्लेगची लागण झालेल्यांची सेवा सुश्रूषा केली व त्यातूनच त्यांनी हे आजार आपल्या अंगावर ओढून घेतले. उपचारासाठी इ.सन १९०२ मध्ये इंग्लडला पोहचल्या. १९०५ मध्ये लंडनला हाईडपार्क मध्ये जोशपूर्ण ओजस्वी भाषण दिले. तेथे असतांना मादाम कामा पितामह दादाभाई नौरोजी यांच्या खाजगी सचिव पदावर दीड वर्ष कार्यरत राहिल्या. प. श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या घरी १० मे १९०५ रोजी १८५७ च्या प्रथम भारतीय स्वातंत्र्य संग्राम या संबंधी सभा घेण्यात आली. तेव्हा अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. त्यावेळी आपल्या ओजस्वी वाणीने मादाम कामा यांनी १८५७ च्या संघर्षातील वीर पुरुषांच्या जीवनावर केलेल्या भाषणातून त्यांच्या क्रांतीकारक विचारांची सर्वांनी प्रचिती झाली नंतरच्या काळात ही त्यांनी वेळोवेळी भाषणाद्वारे लोकांना स्वातंत्र्य संग्रामाला पाठींबा देण्यासठी व त्यात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केले[५].

१८ ऑगस्ट १९०७ रोजी जर्मनीतील स्टटगार्ड येथे आंतरराष्ट्रीय समाजवादी काँग्रेसच्या अधिवेशनासाठी प्रतिनिधी म्हणून आल्या. मादाम कामांना प्रतिनिधित्व मिळू नये म्हणून इंग्लंडचे प्रधानमंत्री रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी पूर्ण प्रयत्न केले होते. ही वैशिष्टपूर्ण बाब लक्षात घेण्यासारखी होती. वरील अधिवेशनात त्यांनी भारतीय स्वातंत्र्याचा प्रस्ताव मांडला. हिन्दुस्थानातून इंग्रजांनी निघून जावे, असे मत स्पष्टपणे मांडलेत कोणी ही इतरांवर अत्याचार व जुलूम करु नये. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ नये. असे परखड मत त्यांनी मांडलेत. पण दुर्दैवाने इंग्लंडच्या विरोधापुढे हा ठराव पास झाला नाही. पण मात्र ह्या अधिवेशनात मादाम कामा यांनी हिंदुस्थानी जनतेची स्वातंत्र्या विषयीची मागणी नि:संदिग्धपणे मांडण्याचे धाडस केले. अर्थातच भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न वारंवार मादाम कामा यांनी इंग्लंड, फ्रांस, जर्मनी इ. देशात फिरुन जगासमोर आणला[६]. हिंदुस्थानातील कोट्यावधी जनतेवर इंग्रजांनी त्यांची हुकूमशाही बळजबरीने लादली होती. दरवर्षी



Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
September, 2021

भारतातून पस्तीस कोटी पौंड एवढी रक्कम इंग्रज लुटून नेतात. त्यांच्या बदल्यात भारताला काय मिळत असे? तर दडपशाही, अमानुष वागणूक आणि अत्याचार ! आपल्या भाषणाचा शेवट करतांना मादाम कामांनी राष्ट्रध्वज देखील फडकावला. त्यावर हिरवा, पिवळा आणि लाल हे तीन रंग म्हणजे भारतातील तीन प्रमुख धर्माचे प्रतिनिधीत्व आठ राज्याचे प्रतिक म्हणून आठ तारे आणि चंद्र व सूर्य त्यावर अंकित होते. राष्टध्वज फडकल्यवार 'वंदे मातरम' हे राष्ट्रध्वज देखील म्हटल्या गेले होते.

सोडून दिलं ------ काम करण्यास नकार दिला तर ? सैन्याने शस्त्र खाली ठेवले तर ? इंग्लंडमधून मूठभर आलेले लोक इतक्या विशाल देशावर शासन कसं चालवू शकतात ? आपलाच देश, आपलेच पैसे, अन ते आपल्याला देता अन भारतीय त्यांची गुलामगिरी पत्करुन काम करतात ? त्यांचे उपरोक्त विचार ऐकणाऱ्यांना नक्कीच पट वणारे होते.

अशाप्रकारे त्या नेहमीच आपल्या भाषणात गुलामगिरीच्या विरोधात बोलत असत व हिंदुस्थानातील सर्व धर्मियांना एकत्रित होऊन संघटित रित्या लढा देण्यासाठी प्रेरित करीत असत.

**भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय असणाऱ्या क्रांतीकारी महिला मादाम कामा :**

स्वातंत्र्यवीर सावरकर व सरदारसिंह राणा यांच्या क्रांतीला शस्त्रास्त्रांची गरज आहे म्हणून मादाम कामांनी १९०९ मध्ये गुप्तपणे भारतात ॲटोमेटिक पिस्तुल व गोळ या पाठविल्या होत्या. त्या पिस्तुलांचा उपयोग करून न्यायाधिशाची हत्या करण्यात आली. त्यांचा तपास कार्यातून वीर सावरकर आणि सरदारसिंह राणा यांना पोलिसांनी पकडू नये म्हणून मादाम कामा स्वत: ब्रिटीश कौन्सीलच्या ऑफीसमध्ये जाऊन संपूर्ण जबावदारी आपल्या वर घेतली. क्रांतीकारकांना वाचविण्यासाठी त्यांनी उचलेले पाऊल लक्षात घेता क्रांतीकारी कळकळ व स्वातंत्र्य प्राप्त करावयाची ईच्छाशक्ती दिसून येते भारताच्या स्वातंत्र्यासाठी कोणतेही कार्य करतांना त्यांनी पुढील परिणामांचा कधीही विचार केला नाही.

मादाम कामांच्या समाजवादी विचारसरणीमुळे त्यांना खुपच प्रसिद्धी मिळाली, त्यांच्या भोवती जमलेल्या अनेक जणांनी स्वातंत्र्य चळवळीत पुढे सहभाग घेतला. दादाभाई नौरोजी यांची नात पेरीन ही मादाम कामांच्या संपर्कात असल्यामुळे १९३० च्या चळवळीत ही सहभागी झाली. पुढे तर त्या मुंबई काँग्रेसच्या सदस्या बनल्या .

१९०८ मध्ये लंडनच्या टॅक्सटन हॉलमध्ये क्रांतीकारकांचे अधिवेशन घेण्यात आले. त्यात लाला लजपतराय, विपिनचंद्रपाल, दादासाहेब खापर्डे, आगाखाँ इ. उपस्थित होते. त्यामध्ये मादाम कामाचे भाषण अधिवेशनात महत्वपूर्ण राहिले. आपल्या भाषणातून त्यांनी ब्रिटीशांशी 'असहयोग व वहिष्काराच्या' तंत्राचा अवलंब करण्याचा प्रस्ताव मांडला. याच काळात भारतात नाशिक खटला सुरु झाला. ज्या क्रांतीकारकांवर खटला सुरु होता त्यांच्यासाठी मादाम कामांनी वकील नियुक्त करुन दिले होते.[७]

**राष्ट्रीय भावना जागृत करणाऱ्या एक महान नेता मादाम कामा :**

इंडिया हाऊस मधील चर्चेमधून त्यांच्या विचारांना चांगलीच धार आली. त्यांच्या बोलण्यात त्याचं प्रत्यय यायचा. आपला शत्रू कोण? याची स्पष्ट जाणीव झाली. तो जर हिंसेचा अवलंब करत असेल तर त्यानेच आपल्याला हिंसा करण्यास भाग पाडले आहे समजून त्या मार्गाने गेल्यास काहीच चूक नाही. त्यांच्या बोलण्यात नेहमीच त्या असहकाराच्या तत्वाचा उल्लेख करीत असत. इंग्रज हिंदस्थानात आले तेथे राज्यकारभार करु लागले कोणाच्या बळावर ? कोणाच्या पाठिंब्यावर हे ते करु शकतात. भारतीयांच्याच बळावर ? भारतीयांनी जर ठरवलं की सर्वांनी त्यांचं काम करायचं एकाच वेळेस इंग्रजांनी वीर सावरकरांना काळयापाण्याची शिक्षा दिली तेव्हा त्यांच्या कुटुंबाचे पालन-पोषण मॅडम कामा यांनी केले. १९३५ मध्ये मादाम कामा आपले उर्वरित आयुष्य



Scanned with CamScanner

मातृभूमीत घालविण्यासाठी मुंबईला परतल्या. तेव्हा त्यांच्यावर ब्रिटीशांनी भाषण व सभा घेण्यावर बंदी घातली. वयाच्या ७४ व्या वर्षी १३ ऑगस्ट १९३७ रोजी मादाम भिकाजी रुस्तम कामा यांचा मृत्यू झाला. पण आपल्या कार्यामुळे त्या अजरामर झाल्या[८].

**निष्कर्ष :**

१) भारतीय स्वातंत्र्यासाठी विदेशात राहून कार्य करणा गा एक महान क्रांतीकारी विदेशी महिला म्हणून आज ही मादाम कामा ओळखल्या जातात.

२) भारतीयांना स्वातंत्र्यासाठी जागृत करण्याचे हिंदु–मुस्लिमांमध्ये ऐक्य निर्माण करुन, महिलांना राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवण्यासाठी प्रेरित करावयाचे महान कार्य मादाम कामा यांनी केले.

३) स्वत:च्या जीवाची पर्वा न करता त्यांनी समाजसेवेचे घेतलेले व्रत पूर्ण केले.

४) भारत देशाला गुलाम बनविणाऱ्या इंग्रजांनी चालते व्हावे व आपल्या स्वातंत्र्यासाठी भारतीयांनी असहकार व बहिष्कार ह्या शस्त्रांचा वापर करावा, हा मोलाचा संदेश दिला.

५) न्यूयार्क येथील प्रेस कॉन्फरन्स मध्ये पत्रकारांच्या समोर भारतीय जनतेची दुर्दशा व व्यथा मांडली त्यांनी आपल्या भाषणात 'अमेरिकन लोकांसमोर म्हटले की आपल्याला आयरलैंड व रशियातील संघर्षाबाबत माहिती आहे. भारतीयांच्या संघर्षाची माहिती ही आपल्याजवळ असू द्या', असे म्हटले.

६) आंतर्राष्ट्रीय स्तरावर भारताच्या स्वांतत्र्याचा प्रश्न नेमून जगभरातील क्रांतीकारकांचे समर्थन लढ्याला मिळवून देण्याचे महान कार्य मादाम कामा यांनी केले.

७) अत्यंत सधन कुटुंबात जन्मास आलेल्या मादाम कामा यांनी सर्व सुखांचा व ऐश्वर्यपूर्ण जीवनाचा त्याग देशासाठी कष्टाचे जीवन पत्करले. अभिमानास्पद बाब आहे.

८) भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात क्रांतीकारक अपयशी ठरले असले तरी त्यांच्यासमोर संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय ठेवण्यात मादाम कामा एक स्त्री क्रांतीकारीच्या रुपात यशस्वी ठरल्या.

अशाप्रकारे मादाम कामा ह्या खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्रेमी आपल्या मातृभूमीसाठी झटणाऱ्या, विदेशात राहून भारतीयांच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ उभारणाऱ्या, भारतीयांच्या व्यथा व दूर्दशा इंडियाहाऊस मध्ये खंबीरपणे मांडणाऱ्या, तत्कालीन भारताचा प्रतिक राष्ट्रध्वज फडकावून वंदेमातरम् राष्ट्रगीत पहिल्यांदा म्हणण्याचा मान पटकाविणाऱ्या प्रथम विदेशी महिला व एक महान क्रांतीकारी महिला होत्या, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भसूची:**

१. पवार निंबाजीराव, सेनापती बापट एक तुफान (सयाजी प्रकाशन नाशिक,) पृ.क्र. २३, २४.

२. शर्मा कालुराम (व्यास प्रकाशन) आधुनिक भारत का राजनैतिक, आर्थिक एवं सामाजिक इतिहास भाग–२ पंचशील प्रकाशन

३. शर्मा एल.पी. आधुनिक भारत (प्रकाशक–लक्ष्मी नारायण अग्रवाल) आगरा, २१ वाँ संशोधित संस्करण २००७ पृ.क्र. ४७१

४. गुप्त मन्मथनाथ, हमारे जुझारु, क्रांतीकारी अनुभव प्रकाशन, दिल्ली, प्रथम संस्करण १९९७ प्र. क्र. ३९,४०

५. उपरोक्त ३६,३७

६. शर्मा कालुराम पृ. ११९

७. गुप्त मन्मथनाथ पृ. क्र. ४०

८. पवार निंबाजीराव पृ.क. २६



Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
September, 2021

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ. काळे भा.ना. — इंग्लंडमधील भारतीयांचा स्वातंत्र्य यज्ञ
२) गोस्वामी सुधा — भारतवर्ष की चर्चित महिलाएं
३) शर्मा नरेशकुमार — स्वतंत्रता संग्राम की भारतीय वीरांगनाएँ
४) डॉ. शांता कोठेकर — आधुनिक भारताचा इतिहास
५) डॉ. शरद कोल्हारकार — भारताचा इतिहास



Scanned with CamScanner